(दिवाणी न्यायालय क. स्तर, कोरेगाव यांचे न्यायालयात)

मोबाईल लोक अदालत दि.१०/०८/२०२६ मु.पो. कुमठे ता. कोरेगाव, जि. सातारा

**समरी फौजदारी खटला क्रमांक २५६/२०२६**
**नि.क्र. - १ सोबत**

**सरकार - फिर्यादी**

**विरुध्द**

**योगेश जगन्नाथ काळोखे - आरोपी**

१. गुन्हा घडल्याचा दिनांक - २९/०४/२०२६

२. फिर्याद दिलेचा दिनांक - २९/०४/२०२६

३. फिर्यादीचे नाव - जितेंद्र विश्वनाथ जाधव, वय – ५४, सहा. फौजदार, वाठार पोलीस ठाणे

४. गु.र.नं. - वाठार पोलीस ठाणे, गु.र.नं. १०७/२०२६

५. आरोपीचे नाव – योगेश जगन्नाथ काळोखे, वय – ३१,
पत्ता - विडणी, ता. फलटण, जि. सातारा

६. **प्रश्न** - **तुम्हाला फिर्याद पेपरच्या नकला मिळाल्या काय ?**
**उत्तर** – **होय.**

७. **गुन्हयाचे स्वरूप** -

या कोर्टाचे स्थलसीमेचे हद्दीपैकी मौजे वाठार स्टेशन गावचे हद्दीत वाई चौक परिसरामध्ये सार्वजनिक ठिकाणी सार्वजनिक रस्त्यावर दि. २९/०४/२०२६ रोजी २१.१५ वाजताचे सुमारास तुम्ही **आरोपी नामे योगेश जगन्नाथ काळोखे, रा. विडणी, ता. फलटण, जि. सातारा** या तंबाखु खात असताना मिळुन आला व त्यामुळे तुम्ही सिगारेट आणि इतर तंबाखु उत्पादन जाहिरात आणि व्यापार व वाणिज्य उत्पादन पुरवठा आणि वितरण नियम मनाई अधिनियम, २००३ चे कलम ४, सह २१(१) प्रमाणे अपराध केल्याचा तुमचेवर आरोप आहे.

प्रश्न - तुम्हाला तुमच्यावर असलेला वर नमूद आरोप जो तुम्हाला आता मराठीतून वाचून दाखवून व समजावून सांगितला आहे तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर – होय

प्रश्न - तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर – होय, मला गुन्हा कबूल आहे. त्याबाबत मी माझया सहीने लेखी अर्ज व त्यासोबत माझे आधार कार्डची झेरॉक्स प्रत सादर केलेली आहे.

प्रश्न – तुम्ही स्वतःहून तुमच्यावर ठेवलेला आरोप स्वखुशीने मान्य व कबूल केला आहे त्यामुळे त्या आरोपास कायद्यानुसार होणा-या शिक्षेस पात्र आहात, त्यामुळे त्या शिक्षेबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे.

उत्तर - माझेकडून सदरचा गुन्हा अजाणतेपाणाने घडला आहे. तरी मी यापुढे तंबाखु सेवन करणार नाही. तरी मला कमीत कमी शिक्षा करण्यात यावी.

दिनांक - १०/०८/२०२६

आरोपीची सही
नाव- योगेश जगन्नाथ काळोखे

(नंदादेवी ता. घाडगे)
निवृत्त जिल्हा न्यायाधीश
पॅनेल प्रमुख
मोबाईल लोक अदालत, कोरेगाव

-: निकालपत्र :-

१. वर नमूद आरोपी याने माझे समोर पुरशीस व त्यासोबत त्याच्या आधार कार्डची झेरॉक्स प्रत एकत्रीत निशाणी क्रमांक ३ अन्वये त्याच्यावर केलेला वर नमूद आरोप स्वतःहून मान्य व कबूल केला आहे. त्यामुळे सिगारेट आणि इतर तंबाखु उत्पादन जाहिरात आणि व्यापार व वाणिज्य उत्पादन पुरवठा आणि वितरण नियम मनाई अधिनियम, २००३ चे कलम ४, सह २१(१) प्रमाणे अपराध केल्याचे सिध्द होत आहे.

२.	सदर आरोपीस शिक्षेबाबत विचारले असता त्याने असे सांगितले आहे की, त्याने त्याचेकडून सदरचा गुन्हा अजाणतेपणाने केला गेला आहे व त्याला कमीत कमी शिक्षा करणेत यावी अशी विनंती केलेली आहे.

३.	वर नमूद परिच्छेदातील कारणास्तव आरोपी यास रक्कम रुपये २००/- (अक्षरी दोनशे रुपये फक्त) एवढा दंड भरणेची शिक्षा देणेत येत आहे. दंड न दिल्यास त्याला कोर्ट उठेपर्यंत न्यायालयामध्ये बसुन राहण्याची शिक्षा भोगायची आहे.

४.	सदरचा दंड आरोपीने दिवाणी व फौजदारी न्यायालय, कोरेगाव येथे आजच भरणेचा आहे.

दिनांक – १०/०८/२०२६

(नंदादेवी ता. घाडगे)
निवृत्त जिल्हा न्यायाधीश
पॅनेल प्रमुख
मोबाईल लोक अदालत, कोरेगाव